पुण्य नगरी

शुक्रवार, २९ नोव्हेंबर २०१९

# विद्यार्थ्यांनो, तंत्रज्ञानात योगदानाचे ध्येय बाळगा : डॉ. विजयालक्ष्मी



## 'विज्ञान, तंत्रज्ञान आणि ग्रामीण विकासा'वर राष्ट्रीय परिषदेचे उद्‌घाटन

**नागपूर :** तंत्रज्ञानाच्या विकासातून मानवाला सोयीसुविधा मिळतात, ही बाब लक्षात घेता विद्यार्थ्यांनी नवीन तंत्रज्ञान विकसित करण्यात आपले योगदान देण्याचे ध्येय बाळगावे, असे आवाहन विज्ञानपरिषद कोलकाता संघटनेच्या अध्यक्षा डॉ. विजयालक्ष्मी सक्सेना यांनी केले.

शिवाजी विज्ञान महाविद्यालयात 'विज्ञान, तंत्रज्ञान आणि ग्रामीण विकास' या विषयावर आयोजित दोनदिवसीय राष्ट्रीय परिषदेच्या उद्‌घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. कोलकाता येथील राष्ट्रीय विज्ञान संघटनेच्या वतीने स्थानिक शिवाजी विज्ञान महाविद्यालयात २७ नोव्हेंबरला परिषदेचे उद्‌घाटन करण्यात आले. यावेळी मंचावर श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावतीचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख, उपाध्यक्ष नरेशचंद्र ठाकरे, अॅड. गजानन पुंडकर, कोषाध्यक्ष दिलीप इंगोले, सदस्य हेमंत काळमेघ, डॉ. अशोककुमार सक्सेना, डॉ. मनोजकुमार चक्रवर्ती, डॉ. निवेदिता चक्रवर्ती, डॉ. सी. आर. बाबू, डॉ. व्ही. पी. उनियाल, डॉ. अतुल बोडखे व किशोर रिठे उपस्थित होते. डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांचे गौरवगीत व विद्यापीठगीताने कार्यक्रमास सुरुवात झाली.

डॉ. विजयालक्ष्मी पुढे म्हणाल्या, आपली शिक्षण व्यवस्था कमजोर होत आहे. यात सुधारणा करण्याची आवश्यकता आहे. विद्यार्थी सोयीसुविधांअभावी जागतिक पातळीवर मागे पडत आहेत. तंत्रज्ञानाच्या वाईट बाजूचा विचार न करता समाजाच्या फायद्याचा विचार व तंत्रज्ञान विकसित करून जीवन समृद्ध करण्याचा विचार विद्यार्थ्यांमध्ये रुजविणे आवश्यक आले.

विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा उपयोग करूनच ग्रामीण क्षेत्राचा विकास शक्य आहे, असे त्या म्हणाल्या. यावेळी प्रोफेसर इमिरेट्स दिल्ली विद्यापीठाचे डॉ. सी.आर. बाबू आणि नीरीचे मुख्य वैज्ञानिक डॉ. जे. एस. पांडे यांनी मार्गदर्शन केले. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. महेंद्र ढोरे यांनी, तर संचालन डॉ. प्रणीता गुल्हाने यांनी केले. आभार डॉ. श्याम अनवाने यांनी मानले.

सकाळ » TODAY
नागपूर, गुरुवार, २८ नोव्हेंबर २०१९ | ३

# विज्ञान व तंत्रज्ञानातून ग्रामीण विकास शक्य

## माजी मंत्री हर्षवर्धन देशमुख; दोनदिवसीय राष्ट्रीय परिषदेचे उद्‌घाटन



काँग्रेसनगर : श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालयात आयोजित दोनदिवसीय राष्ट्रीय परिषदेचे उद्‌घाटन करताना श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख. डॉ. विजयालक्ष्मी सक्सेना, प्राचार्य डॉ. महेंद्र ढोरे, डॉ. अशोककुमार सक्सेना, डॉ. मनोजकुमार चक्रवर्ती व मान्यवर.

**सकाळ वृत्तसेवा**

नागपूर, ता. २७ : विज्ञान व तंत्रज्ञानाचे फायदे अनेक असताना तोटेही आहेत. परंतु, आपल्याला फायदाचा विचार करून जीवन समृद्ध करण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करावा लागेल. शिवाय विज्ञान तंत्रज्ञानाच्या माध्यमातून ग्रामीण विकासाचे लक्ष्य गाठायचे आहे, असे प्रतिपादन श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष व माजी मंत्री हर्षवर्धन देशमुख यांनी केले.

श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालयात कोलकता येथील राष्ट्रीय विज्ञान संघटनेद्वारा पुरस्कृत दोनदिवसीय राष्ट्रीय परिषदेच्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमात कोलकता येथील विज्ञान परिषद संघटनेच्या अध्यक्ष डॉ. विजयालक्ष्मी सक्सेना, संस्थेचे नरेशचंद्र ठाकरे, अ‍ॅड. गजानन पुंडकर, दिलीप इंगोले, हेमंत काळमेघ, विज्ञान परिषदेचे पदाधिकारी डॉ. अशोककुमार सक्सेना, डॉ. मनोजकुमार चक्रवर्ती, डॉ. सी. आर. बाबू, डॉ. व्ही. पी. डनियाल, डॉ. अतुल बोडखे, किशोर रिठे उपस्थित होते.

हर्षवर्धन देशमुख म्हणाले, ग्रामीण भागात सोयी सुविधा उपलब्ध होत नसल्याने येथील नागरिकांचे स्थलांतर वाढले आहे. त्यामुळे शहरातील सोयी-सुविधांवर दबाव निर्माण होतो आहे. याउलट ग्रामीण भागात विज्ञान व तंत्रज्ञानाचा उपयोगातून ग्रामीण भागात सुविधा आणि सोयी उपलब्ध करून देण्यात याव्यात, असे ते म्हणाले. डॉ. विजयालक्ष्मी सक्सेना म्हणाल्या की, मानवी जीवन व तंत्रज्ञान यांचे संबंध परस्पर आहे. तंत्रज्ञानाच्या माध्यमातून मानवाला अनेक सोयी सुविधा मिळतात. परंतु, त्याचा योग्य उपयोग झाला नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. उलट आपली शिक्षण व्यवस्था कोलमडत असून त्यात सुधारणा करण्याची गरज आहे. विद्यार्थ्यांकडे सोयी सुविधांचा अभाव असल्याने जागतिक पातळीवर आपण मागे पडत असल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे प्रत्येकाने विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रात योगदान देण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महेंद्र ढोरे यांनी केले. संचालन डॉ. प्रणीता गुल्हाने यांनी केले. आभार डॉ. श्याम अनवाने यांनी मानले.

सकाळ » TODAY
नागपूर, शुक्रवार, २९ नोव्हेंबर २०१९ | ८

# ग्रामीण विकासासाठी कौशल्य शिक्षणाची गरज

## कोषाध्यक्ष दिलीप इंगोले : शिवाजी विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय परिषदेचा समारोप

**सकाळ वृत्तसेवा**

नागपूर, ता. २८ : कृषिप्रधान देश असताना ग्रामीण विकास झालेला नाही. ती समस्या सोडविण्यासाठी विज्ञान व तंत्रज्ञान उपयुक्त ठरू शकते. आता ग्रामीण भागाचा विकास साधायचा असल्यास कौशल्य विकासाची नितांत गरज आहे, असे प्रतिपादन श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे दिलीप इंगोले यांनी केले.

श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालयात कोलकता येथील राष्ट्रीय विज्ञान संघटनेद्वारा पुरस्कृत दोनदिवसीय राष्ट्रीय परिषदेच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते. यावेळी वरिष्ठ वैज्ञानिक डॉ. बिलाल हबीब, संस्थेचे उपाध्यक्ष अ‍ॅड. गजानन पुंडकर, शेषराव खाडे, सदस्य हेमंत काळमेघ, प्राचार्य डॉ. महेंद्र ढोरे, डॉ. अतुल बोडखे, डॉ. ओमराज देशमुख उपस्थित होते.



काँग्रेसनगर : श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालयात दोनदिवसीय राष्ट्रीय परिषदेच्या समारोपप्रसंगी संस्थेचे कोषाध्यक्ष दिलीप इंगोले, डॉ. बिलाल हबीब, अ‍ॅड. गजानन पुंडकर, शेषराव खाडे, हेमंत काळमेघ, डॉ. महेंद्र ढोरे, डॉ. अतुल बोडखे, डॉ. ओमराज देशमुख.

दिलीप इंगोले म्हणाले, सध्या जंगले नष्ट होत असल्यामुळे नैसर्गिक समस्या निर्माण होत आहे. त्यामुळे झाडे लावणे काळाची गरज बनली आहे. भाऊसाहेब पंजाबराव देशमुख यांचे मोठे कार्य आहे. ग्रामीण भागाचा विचार करून त्यांनी उपेक्षित वर्गांसाठी उच्च शिक्षणाची दारे उघडी केली. त्यांनी मांडलेल्या लोकशिक्षणाच्या संकल्पनेमुळे ग्रामीण भागात शिक्षणाची गंगा पोहोचली. आता या शिक्षणाला कौशल्यविकासाची जोड द्यावी लागणार आहे. त्यातून विकास साधता येणे शक्य होईल. त्यासाठी श्री शिवाजी शिक्षण संस्था महत्त्वपूर्ण योगदान देणार असल्याचे ते म्हणाले.

समारोपापूर्वी डॉ. बिलाल हबीब व डॉ. लालसिंग यांनी विज्ञान व तंत्रज्ञानाने मानवी जीवन कसे समृद्ध होते, यावर प्रकाश टाकला. हेमंत काळमेघ यांनी भाऊसाहेबांचे ग्रामीण भागातील विकासासाठी दिलेल्या योगदानाबद्दल माहिती दिली. तसेच लोकशाहीच्या संकल्पनेचे विस्तारीकरण करण्यासाठीही प्रयत्न केल्याचे स्पष्ट केले. राष्ट्रीय परिषदेमध्ये १०७ शोधनिबंधांचे वाचन करण्यात आले. तसेच संशोधकांनी यात सहभाग नोंदविला. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. महेंद्र ढोरे यांनी केले. संचालन डॉ. प्रणिता गुन्हाने यांनी केले. आभार डॉ. अतुल बोबडे यांनी मानले.

देशोन्नती

नागपूर

गुरुवार, दि. २८ नोव्हेंबर २०१९

# विज्ञान व तंत्रज्ञानातून ग्रामीण विकास शक्य

## श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांचे प्रतिपादन

*प्रतिनिधी / २७ नोव्हेंबर*

**नागपूर :** विज्ञान व तंत्रज्ञानाचे फायदे अनेक असताना तोटेही आहेत. परंतु, आपल्याला फायदाचा विचार करून जीवन समृद्ध करण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करावा लागेल. शिवाय विज्ञान तंत्रज्ञानाच्या माध्यमातून ग्रामीण विकासाचे लक्ष्य गाठायचे आहे, असे प्रतिपादन श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावतीचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांनी केले.

स्थानिक श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालयात कलकत्ता येथील राष्ट्रीय विज्ञान संघटनेद्वारा पुरस्कृत दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन २७ व २८ नोव्हेंबर रोजी करण्यात आले. आज २७ नोव्हेंबर रोजी उद्घाटनाप्रसंगी अध्यक्षीय भाषणातून ते बोलत होते. यावेळी विज्ञान परिषद कलकत्ता संघटनेच्या अध्यक्षा डॉ.विजयालक्ष्मी सक्सेना, नरेंशचंद्र ठाकरे, ॲड.गजानन पुंडकर, दिलीप इंगोले, हेमंत काळमेघ, विज्ञान परिषदेचे पदाधिकारी डॉ.अशोककुमार सक्सेना, डॉ.मनोजकुमार चक्रवर्ती, डॉ.सी.आर. बाबू, डॉ.व्ही.पी. उनियाल, डॉ.अतुल बोडखे, किशोर रिठे आदी मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते.



**दीपप्रज्वलन करताना संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख व बाजूला डॉ.विजयालक्ष्मी सक्सेना, नरेंशचंद्र ठाकरे, ॲड.गजानन पुंडकर, दिलीप इंगोले, हेमंत काळमेघ, विज्ञान परिषदेचे पदाधिकारी**

### सुविधांचा योग्य उपयोग नाही : डॉ.विजयालक्ष्मी सक्सेना

यावेळी डॉ.विजयालक्ष्मी सक्सेना म्हणाल्या की, मानवी जीवन व तंत्रज्ञान यांचे संबंध परस्पर आहे. तंत्रज्ञानाच्या माध्यमातून मानवाला अनेक सोयी सुविधा मिळतात. परंतु, त्याचा योग्य उपयोग झाला नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. उलट आपली शिक्षण व्यवस्था कोलमडत असून त्यात सुधारणा करण्याची गरज आहे.

विद्यार्थ्यांकडे सोयी सुविधांचा अभाव असल्याने जागतिक पातळीवर आपण मागे पडत असल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे प्रत्येकाने विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रात योगदान देण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.महेंद्र ढोरे यांनी केले. संचालन डॉ.प्रणीता गुल्हाने यांनी तर आभार डॉ.श्याम अनवाने यांनी मानले.

The Hitavada
NAGPUR ■ Friday ■ November 29 ■ 2019

# Basic needs are not adequate to conduct research: Dr Saxena

■ National conference on rural development concludes on high note

■ **Staff Reporter**

DR VIJAYLAXMI Saxena, General President, Indian Science Congress Association (ISCA) in her speech harped on education. "Education is not contemporary. The very basic needs are not adequate to carry out research. The education system is being exploited," said Dr Saxena. With reference to agriculture Dr Saxena stressed on the dependency of agriculture products on rain water. There is no thought of utilizing water resources optimally. Immediate action is required to recharge natural resources.

Dr Saxena was speaking during the inauguration of two-day National Conference on Science and Technology: Rural Development at Shri Shivaji Education Society Amravati's Science College sponsored by The Indian Science Congress Association, Kolkata.

Road map is required to be prepared for translating basic needs of rural population. Dr Saxena urged everyone to extend knowledge with them, for upbringing life of rural population in near future.



Harshvardhan Deshmukh lighting the lamp. Hemant Kalmegh, Dr Mahendra Dhore and others look on.

Dr Ashok Kumar Saxena manifested concern for scientific culture development through state of art ambience to fulfill the dreams.

Following his speech, the dignitaries on the dais released Souvenir of the conference.

The chairman of the function Harshvardhan Deshmukh expressed his sincere desire for transforming rural economy through science and technology development. He has shown deep concern about declining GDP through agriculture product which in turn affecting economy and further quality of life.

The key note speaker Dr C R Babu highlighted the intricacies of Technology and pointed out certain areas where a good amount of research can be done.

Principal Dr M P Dhore took a review of the college right from its inception to its present day glory and the convener of the conference Dr A D Bobdey harped on the very essence of the topic by way of translating the immediate need of the technology to rural development. The session ended with vote of thanks by Dr S W Anwane. Around 300 delegates across the globe were present for the inaugural function.

# विज्ञान की मदद से शिक्षा प्रणाली को निखारने की जरूरत : सक्सेना

## शिवाजी साइंस में दो दिवसीय परिषद का हुआ उद्घाटन



**भास्कर प्रतिनिधि| नागपुर** तकनीक के माध्यम से इंसान को अनेक सुख सुविधाएं प्राप्त हुई हैं, लेकिन फिर भी तकनीक का योग्य उपयोग हुआ है ऐसा मुझे नहीं लगता। हमारी शिक्षा व्यवस्था कमजोर होती जा रही है, इसमें सुधार करने की जरूरत है। हमारे विद्यार्थी सुविधाओं के आभाव में वैश्विक स्तर पर पिछड़ते जा रहे हैं। ऐसे में हमें इस बात पर जोर देना चाहिए कि विज्ञान और तकनीक के उपयोग से हम शिक्षा प्रणाली को कैसे सुधार सकते हैं। राष्ट्रीय विज्ञान संगठन की अध्यक्ष डॉ. विजयलक्ष्मी सक्सेना ने बुधवार को शहर के शिवाजी साइंस कॉलेज में आयोजित दो दिवसीय राष्ट्रीय परिषद के उद्घाटन सत्र में बतौर मुख्य अतिथि अपने विचार रखे। 'विज्ञान व तंत्रज्ञान और ग्रामीण विकास' विषय पर इस परिषद का आयोजन किया गया है। शिवाजी शिक्षा संस्था के अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख उद्घाटन सत्र की अध्यक्षता की। उन्होंने कहा कि विज्ञान व तकनीक के उपयोग से ग्रामीण क्षेत्रों का विकास संभव है। विज्ञान व तकनीक के जितने फायदे हैं, उतने ही नुकसान भी हैं। लेकिन इसे मनुष्यों के लिए अधिक से अधिक फायदेमंद बनाने पर हमारा जोर होना चाहिए। कॉलेज प्राचार्य डॉ. महेंद्र ढोरे ने कार्यक्रम की प्रस्तावना रखी। आभार प्रदर्शन डॉ. श्याम अनवाने ने किया। संचालन डॉ.प्रणीता गुल्हाने ने किया। उद्घाटन सत्र के बाद दिल्ली यूनिवर्सिटी के प्रोफेसर डॉ.सी.आर.बाबू और नीरी के मुख्य वैज्ञानिक डॉ.जे.एस.पांडे ने भी अपने विचार रखे। कार्यक्रम में संगठन पूर्व अध्यक्ष डॉ. अशोक कुमार सक्सेना, डॉ. मनोज कुमार चक्रवर्ती, डॉ. एस. रामकृष्णा, डॉ. अनूप जैन, डॉ. शिव सत्यप्रकाश, डॉ. निवेदिता चक्रवर्ती, डॉ. सी.आर. बाबू व डॉ. वी.पी उनियाल प्रमुख रूप से उपस्थिति थी।